# महाराष्ट्र शासन

## महिला व बाल विकास आयुक्तालय महाराष्ट्र राज्य, पुणे -1

### विविध संवर्गातील पदभरतीसाठी जाहिरात 2015

जाहिरात क्रमांक 01/2015

महिला व बाल विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांच्या आस्थापनेवरील विविध रिक्त पदे भरण्याकरीता अर्हताधारक / पात्र उमेदवारांकडून विहित नमुन्यात फक्त ऑनलाईन पध्दतीनेच www.wcdexam.in या संकेत स्थळावर अधिकृत अर्ज मागविण्यात येत आहेत.

| **ऑनलाईन अर्ज भरण्याची सुरुवात** | **ऑनलाईन अर्ज भरण्याची अंतिम मुदत** |
|---|---|
| दिनांक 29/04 /2015 रोजी दुपारी 12.00 पासून | दिनांक 19/05 /2015 सायंकाळी 05.30 पर्यंत |

सरळसेवा भरती प्रक्रिया संदर्भातील सविस्तर जाहीरात www.wcdexam.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून उमेदवारांनी संपुर्ण माहीती काळजीपुर्वक समजून घेऊनच ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करावेत. प्रस्तुत पदांकरीता केवळ उक्त संकेतस्थळावरुन विहित ऑनलाईन पध्दतीने भरलेले अर्ज व विहित चलनाद्वारे भरलेले परिक्षा शुल्क ग्राहय धरण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत. सदर संकेतस्थळाला भरती प्रक्रिये दरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रियेची माहिती बाबत अद्ययावत राहण्याची जबाबदारी उमेदवारांची राहिल.

भरती प्रक्रिया/परीक्षा स्थगित करणे किंवा रद्द करणे, अंशत: बदल करणे, पूर्णतः रद्द करणे, पदांच्या एकूण व संवर्ग निहाय संख्येमध्ये वाढ किंवा घट करण्याचे अधिकार आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय महाराष्ट्र राज्य, पुणे-1 यांना राहतील व त्यांचा निर्णय अंतिम असेल. तसेच भरतीप्रक्रिये संदर्भात वाद, तक्रारी बाबत अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय महाराष्ट्र राज्य, पुणे-1 यांना राहतील. त्याबाबत कोणताही दावा सांगता येणार नाही.

**पदनिहाय रिक्त पदे**

## 1. संरक्षण अधिकारी (गट-ब अराजपत्रित)

(पे बँड 9300 - 34800 ग्रेड पे – 4300)

| जातप्रवर्ग | रिक्त पद संख्या | महिला | माजी सैनिक | खेळाडू | प्रकल्प ग्रस्त | भूकंप ग्रस्त | अंशकालीन | समांतर आरक्षणा व्यतिरिक्त इतर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अनु. जाती | 2 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 |
| अनु. जमाती | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 |
| विमुक्त जाती (अ) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| भ ज (ब) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| भ ज (क) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| भ ज (ड) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| विशेष मागास प्रवर्ग | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| इतर मागासवर्गीय | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 |
| खुला | 5 | 2 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 3 |
| एकूण | 9 | 3 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 6 |

P/5

## 2. विधी सल्लागार (गट-ब अराजपत्रित)

(पे बँड 9300 - 34800 ग्रेड पे – 4300)

| जातप्रवर्ग | रिक्त पद संख्या | महिला | माजी सैनिक | खेळाडू | प्रकल्प ग्रस्त | भूकंप ग्रस्त | अंशकालीन | समांतर आरक्षणा व्यतिरिक्त इतर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अनु. जाती | 2 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 |
| अनु. जमाती | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 |
| विमुक्त जाती (अ) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| भ ज (ब) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| भ ज (क) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| भ ज (ड) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| विशेष मागास प्रवर्ग | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| इतर मागासवर्गीय | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 |
| खुला | 5 | 2 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 3 |
| एकूण | 9 | 3 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 6 |

3. **समुपदेशक** (गट-ब अराजपत्रित)

(पे बँड 9300 - 34800 ग्रेड पे – 4300)

| जातप्रवर्ग | रिक्त पद संख्या | महिला | माजी सैनिक | खेळाडू | प्रकल्प ग्रस्त | भूकंप ग्रस्त | अंशकालीन | समांतर आरक्षणा व्यतिरिक्त इतर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अनु. जाती | 2 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 |
| अनु. जमाती | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 |
| विमुक्त जाती (अ) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| भ ज (ब) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| भ ज (क) | 2 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 2 |
| भ ज (ड) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| विशेष मागास प्रवर्ग | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| इतर मागासवर्गीय | 2 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 |
| खुला | 3 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 2 |
| एकूण | 10 | 3 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 7 |

## 4. कृषि सहाय्यक

(पे बँड 5200 - 20200 ग्रेड पे – 1900)

| जातप्रवर्ग | रिक्त पद संख्या | महिला | माजी सैनिक | खेळाडू | प्रकल्प ग्रस्त | भूकंप ग्रस्त | अंशकालीन | समांतर आरक्षणा व्यतिरिक्त इतर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अनु. जाती | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 |
| अनु. जमाती | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 |
| विमुक्त जाती (अ) | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 |
| भ ज (ब) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| भ ज (क) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| भ ज (ड) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| विशेष मागास प्रवर्ग | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| इतर मागासवर्गीय | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| खुला | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| एकूण | 3 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 3 |

P|11

## 5. शिक्षक

(पे बँड 5200 - 20200 ग्रेड पे - 2400)

| जातप्रवर्ग | रिक्त पद संख्या | महिला | माजी सैनिक | खेळाडू | प्रकल्प ग्रस्त | भूकंप ग्रस्त | अंशकालीन | समांतर आरक्षणा व्यतिरिक्त इतर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अनु. जाती | 2 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 |
| अनु. जमाती | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 |
| विमुक्त जाती (अ) | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 |
| भ ज (ब) | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 |
| भ ज (क) | 1 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| भ ज (ड) | 1 | 0 | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 0 |
| विशेष मागास प्रवर्ग | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| इतर मागासवर्गीय | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 |
| खुला | 13 | 4 | 3 | 1 | 0 | 0 | 2 | 3 |
| एकूण | 21 | 6 | 3 | 1 | 1 | 0 | 2 | 8 |

**अपंग आरक्षणः वरील पदांमध्ये 1 पद अल्पदृष्टी (क्षीणदृष्टी) प्रवर्गासाठी राखीव आहे.**

**आवश्यक शैक्षणिक अर्हता / अनुभव.**

खाली नमूद केलेली शैक्षणिक अर्हता व अनुभव 01/05 /2015 या दिनांकास प्रमाणपत्रासहीत पूर्ण धारण करणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | संवर्ग(पदनाम) | किमान शैक्षणिक अर्हता /अनुभव |
|---|---|---|
| 1 | संरक्षण अधिकारी | 1. उमेदवाराने **समाज कार्य यामधील पदव्युत्तर पदवी** ही अर्हता धारण करणे आवश्यक आहे.<br>2. समाज कार्यातील किमान 3 वर्षांचा अनुभव धारण करणा-या उमेदवारांना प्राधान्य.<br>3. उमेदवार D.O.E.A.C.C. सोसायटीच्या अधिकृत C.C.C. किंवा O स्तर किंवा B स्तर किंवा C स्तर यापैकी कोणतीही एक परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र **किंवा** महाराष्ट्र राज्य उच्च तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांच्याकडील अधिकृत MS-CIT परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र **किंवा** महाराष्ट्र शासन, माहिती तंत्रज्ञान (सा.प्र.वि.) विभागाकडील शासन निर्णय क्र. मातंस 2012/प्र.क्र. 277/39 दिनांक 04 फेब्रुवारी 2013 मध्ये नमुद केलेल्या संगणक/माहिती तंत्रज्ञान विषयक परीक्षा उत्तीर्ण असावा. |
| 2 | विधी सल्लागार | 1. **उमेदवाराने कायद्याची पदवी** ही अर्हता धारण करणे आवश्यक आहे.<br>2. उमेदवाराकडे उच्च न्यायालय किंवा दुय्यम न्यायालयामध्ये अधिवक्ता म्हणून किमान दोन वर्षे इतका कामाचा अनुभव असणे आवश्यक.<br>3. उमेदवार D.O.E.A.C.C. सोसायटीच्या अधिकृत C.C.C. किंवा O स्तर किंवा B स्तर किंवा C स्तर यापैकी कोणतीही एक परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र **किंवा** महाराष्ट्र राज्य उच्च तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांच्याकडील अधिकृत MS-CIT परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र **किंवा** महाराष्ट्र शासन, माहिती तंत्रज्ञान (सा.प्र.वि.) विभागाकडील शासन निर्णय क्र. मातंस 2012/प्र.क्र. 277/39 दिनांक 04 फेब्रुवारी 2013 मध्ये नमुद केलेल्या संगणक/माहिती तंत्रज्ञान विषयक परीक्षा उत्तीर्ण असावा. |
| 3 | समुपदेशक | 1. उमेदवाराने **समाज कार्य यामधील पदव्युत्तर पदवी** ही अर्हता धारण करणे आवश्यक आहे.<br>2. परंतु ज्या समाज कार्य या मधील तीन वर्षाचा अनुभव असेल आणि घरेलू हिंसाचार, हुंडा, बालविवाह, देवदासी प्रथा निर्मुलन या संदर्भात महिलांना समुपदेशन करण्याचा अनुभव असेल अशा उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल.<br>3. उमेदवार D.O.E.A.C.C. सोसायटीच्या अधिकृत C.C.C. किंवा O स्तर किंवा B स्तर किंवा C स्तर यापैकी कोणतीही एक परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र **किंवा** महाराष्ट्र राज्य उच्च तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांच्याकडील अधिकृत MS-CIT परिक्षा उत्तीर्ण |

P|15

| | | |
|---|---|---|
| | | झाल्याचे प्रमाणपत्र **किंवा** महाराष्ट्र शासन, माहिती तंत्रज्ञान (सा.प्र.वि.) विभागाकडील शासन निर्णय क्र. मातंस 2012/प्र.क्र. 277/39 दिनांक 04 फेब्रुवारी 2013 मध्ये नमुद केलेल्या संगणक/माहिती तंत्रज्ञान विषयक परीक्षा उत्तीर्ण असावा. |
| 4 | कृषि सहाय्यक | 1. उमेदवार हा मान्यताप्राप्त कृषि विद्यापीठाची दोन वर्षांची कृषिविषयक पदवीका किंवा त्यास समकक्ष म्हणून शासनाने घोषित केलेली इतर कोणतीही अर्हता धारण करणे आवश्यक. **किंवा**<br>2. मान्यताप्राप्त ग्रामिण प्रशिक्षण संस्थेचे कृषि विषयातील कामाचे एक वर्षाचे मुलभूत प्रशिक्षण पुर्ण केल्याचे प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक.<br>3. उमेदवार D.O.E.A.C.C. सोसायटीच्या अधिकृत C.C.C. किंवा O स्तर किंवा B स्तर किंवा C स्तर यापैकी कोणतीही एक परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र **किंवा** महाराष्ट्र राज्य उच्च तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांच्याकडील अधिकृत MS-CIT परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र **किंवा** महाराष्ट्र शासन, माहिती तंत्रज्ञान (सा.प्र.वि.) विभागाकडील शासन निर्णय क्र. मातंस 2012/प्र.क्र. 277/39 दिनांक 04 फेब्रुवारी 2013 मध्ये नमुद केलेल्या संगणक/माहिती तंत्रज्ञान विषयक परीक्षा उत्तीर्ण असावा. |
| 5 | शिक्षक | 1. उमेदवार हा मान्यताप्राप्त संस्थेची दोन वर्षांची शिक्षणशास्त्र पदवीका किंवा त्यास समकक्ष म्हणून शासनाने घोषित केलेली इतर कोणतीही अर्हता धारण करणे आवश्यक.<br>2. पा शालेय शिक्षण व क्रिडा विभाग शासन निर्णय आरटीई-2010/प्र.क्र.572/प्रशि-1, दि. 13 फेब्रुवारी, 2013 व शालेय शिक्षण व क्रिडा विभाग शासन निर्णय आरटीई 2013/प्र.क्र.91/प्राशि-1, दि. 23 ऑगस्ट 2013 नुसार उमेदवार महाराष्ट्र शासनाद्वारे घेतली जाणारी **वरिष्ठ प्राथमिक (इयत्ता 6 वी ते 8 वी) शिक्षक पात्रता परीक्षा** (Teachers Eligibility Test) या परक्षि मध्ये किमान ६०% गुण प्राप्त करण्याऱ्या उमेदवारास (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, भटक्या विमुक्त जाती/जमाती, विशेष मागास प्रवर्ग, इतर मागास वर्ग-प्रवर्ग आणि अपंग उमेदवारांना ५५%) उत्तीर्ण समजण्यात येईल.<br>3. उमेदवार D.O.E.A.C.C. सोसायटीच्या अधिकृत C.C.C. किंवा O स्तर किंवा B स्तर किंवा C स्तर यापैकी कोणतीही एक परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र **किंवा** महाराष्ट्र राज्य उच्च तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांच्याकडील अधिकृत MS-CIT परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र **किंवा** महाराष्ट्र शासन, माहिती तंत्रज्ञान (सा.प्र.वि.) विभागाकडील शासन निर्णय क्र. मातंस 2012/प्र.क्र. 277/39 दिनांक 04 फेब्रुवारी 2013 मध्ये नमुद केलेल्या संगणक/माहिती तंत्रज्ञान विषयक परीक्षा उत्तीर्ण असावा. |

**वयोमर्यादा**

वयोमर्यादेकरीता उमेदवाराचे दिनांक 01/05 /2015 रोजीचे वय विचारात घेतले जाईल.

सर्वसाधारण उमेदवाराचे वय दिनांक 01/05 /2015 रोजी 18 वर्षा पेक्षा कमी नसावे व 33 वर्षां पेक्षा जास्त नसावे.

<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>आरक्षण/ समांतर आरक्षण</th><th>शासननियमा नूसार आरक्षणांकरिता कमाल वयोमर्यादा</th></tr>
<tr><td>1</td><td>मागासवर्गीय उमेदवार</td><td>38 वर्षे</td></tr>
<tr><td>2</td><td>अपंग उमेदवार</td><td rowspan="6">45 वर्षे</td></tr>
<tr><td>3</td><td>प्रकल्पग्रस्त</td></tr>
<tr><td>4</td><td>भुकंपग्रस्त</td></tr>
<tr><td>5</td><td>सन 1991 चे जनगणना /सन 1994 नंतरचे निवडणूक कर्मचारी</td></tr>
<tr><td>6</td><td>अपंग माजी सैनिक</td></tr>
<tr><td>7</td><td>स्वातंत्र्य संग्राम सैनिकाचे नाम निर्देशित पाल्य</td></tr>
<tr><td>8</td><td>अंशकालीन कर्मचारी</td><td>46 वर्षे</td></tr>
<tr><td>9</td><td>शासकीय कर्मचारी</td><td>10 वर्षे शिथीलक्षम</td></tr>
<tr><td rowspan="2">10</td><td rowspan="2">उच्च गुणवत्ताधारक खेळाडु उमेदवार</td><td>खुला प्रवर्ग 38 वर्षे</td></tr>
<tr><td>मागासवर्गीय 43 वर्षे</td></tr>
</table>

माजी सैनिकांसाठी विहीत वयोमर्यादेतील सवलत, सामान्य प्रशासन विभाग, शासन शुद्धीपत्रक क्रमांकः मासैक-1010/प्र.क्र.279/10/16-अ, दिनांक 20 ऑगस्ट, 2010 प्रमाणे राहील.

**परिक्षेचे स्वरुप**

| अ.क्र | पदनाम / संवर्ग | परिक्षेसाठी गुण | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | लेखी परिक्षा | व्यावसायीक चाचणी | मौखिक परिक्षा | एकूण गुण |
| 1 | संरक्षण अधिकारी **(गट-ब अराजपत्रित)** | 200 | -- | -- | 200 |
| 2 | विधी सल्लागार **(गट-ब अराजपत्रित)** | 200 | -- | -- | 200 |
| 3 | समुपदेशक **(गट-ब अराजपत्रित)** | 200 | -- | -- | 200 |
| 4 | कृषि सहाय्यक | 200 | -- | -- | 200 |
| 5 | शिक्षक | 200 | -- | -- | 200 |

लेखी परिक्षेच्या प्रश्नपत्रिकेचे स्वरुप सर्वसाधारणपणे खालील प्रमाणे राहील.

1. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक प्रानिमं-1214/प्र.क्र.(43/14)/13-अ, दिनांक 05/06/2014 मधील तरतुदीनुसार वरील पदांकरीता मुलाखत घेण्यात येणार नसल्याने लेखी परीक्षेमध्ये प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे गुणवत्तेनुसार अंतिम निवड केली जाईल.
2. लेखी परिक्षेच्या प्रश्नपत्रिका वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपाच्या असतील.
3. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक प्रानिमं-1214/प्र.क्र.(43/14)/13-अ, दिनांक 05/06/2014 मधील तरतुदीनुसार लेखी परीक्षेला मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान व बौध्दिक चाचणी या विषयांवरील प्रश्नांकरीता प्रत्येकी 50 गुण ठेउन 200 गुणांची लेखी परीक्षा घेतली जाईल.
4. गुणवत्ता यादीत अंतर्भाव करण्यासाठी उमेदवारांनी एकुण गुणांच्या किमान 45 टक्के गुण प्राप्त करणे आवश्यक राहील.
5. उमेदवारांची मुलाखत घेण्यात येणार नसल्याने लेखी परीक्षेमध्ये प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे गुणवत्तेनुसार अंतिम निवडीसाठी उमेदवारांना शैक्षणिक व इतर संबंधित मूळ प्रमाणपत्रे तपासणीसाठी उपलब्ध करुन द्यावी लागतील. अन्यथा अंतिम निवडीसाठी विचार केला जाणार नाही.
6. लेखी परिक्षा, कागदपत्रे छाननी, इ. करिता प्रवेशपत्र, कार्यक्रम, विविध सूचना या केवळ संकेत स्थळावरुनच उपलब्ध करण्यात येतील पोस्टाद्वारे पाठविण्यात येणार नाहीत. सबब सदर संकेतस्थळाला भरती प्रक्रिये दरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रियेची माहिती/कार्यक्रमा बाबत अद्ययावत राहण्याची, प्रवेशपत्र डाऊनलोड करुन घेण्याची जबाबदारी उमेदवाराची राहिल.

**पदांच्या निवडीसाठी कार्यपद्धती, अटी, शर्ती.**

1. लेखीपरीक्षेअंती उमेदवारांचे प्राप्त गुण, जाहिरातीनूसार आवश्यक पात्रता व ऑनलाईन अर्जात भरलेली माहिती यांच्या आधारे मूळ कागदपत्र पडताळणी करण्याकरिता अंतरिम स्वरुपात यादि जाहीर करण्यात येईल. ज्या उमेदवारांची जाहिरातीनूसार आवश्यक पात्रता व ऑनलाईन अर्जात भरलेली माहिती, परिक्षा शुल्क, मूळ कागदपत्रांच्या आधारे परीपुर्ण सिद्ध होईल अशाच उमेदवारांचा विचार भरती प्रक्रियेच्या पुढील टप्प्या करीता करण्यात येईल. जाहिरातीत नमूद केलेली संपुर्ण अर्हता, ऑनलाईन अर्जात भरलेली माहिती व मूळ कागदपत्र तपासणीच्या वेळी सादर केलेली कागदपत्रे यामध्ये तफावत आढळल्यास उमेदवारांची उमेदवारी भरती प्रक्रियेच्या कुठल्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल. नसेच उमेदवारांने मागीतलेले सामाजिक किंवा समांतर

आरक्षण अथवा वयोमर्यादा शिथिलीकरण, परिक्षा शुल्क इ. सारख्या सवलती नामंजूर करण्यात येतील, संबंधित उमदेवाराचा अर्ज रद्द करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

**2.** अंतिम निवड

शासन निर्णय सा.प्र. विभाग, प्रानिमं-2007/प्र.क्र.46/07/13-अ, दिनांक 27/06/2008 अन्वये,

अ) उमेदवारांची अंतिम निवड हि लेखी परिक्षेत मिळालेल्या एकूण गुणांच्या आधारे केली जाईल.

ब) एकाच स्थानासाठी (Position) दोन किंवा अधिक उमेदवारांना **समान गुण** मिळाल्यास खालील प्राधान्य क्रमाच्या आधारे उमेदवाराची अंतिम निवड केली जाईल.

1. अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास उच्च शैक्षणिक अर्हता धारण करणारे उमेदवार, त्यानंतर,
2. मागासवर्ग उमेदवारांच्या बाबतीत प्रथम अनुसूचित जमाती मधील नंतर अनुसूचित जाती, विशेष मागासप्रवर्ग, विमुक्त जाती (14 व तत्सम जाती, भटक्या जमाती जानेवारी -1990 - पुर्वीच्या 28 तत्सम जाती), भटक्या जमाती (धनगर व तत्सम), इतर मागासवर्ग या क्रमाने; त्यानंतर,
3. शारीरिक दृष्ट्या अपंग असलेले उमेदवार त्यानंतर,
4. माजी सैनिक असलेले उमेदवार त्यानंतर,
5. स्वातंत्र्य सैनिकाचे पाल्य असलेले उमेदवार त्यानंतर,
6. वय (वयाने ज्येष्ठ असलेल्या उमेदवाराचा क्रम वरती लागेल.)

वरील प्रत्येक संवर्गामध्ये महिलांना अग्रक्रम देण्यात येईल.

**<u>नेमणुकीच्या सर्वसाधारण अटी</u>**

1. <u>संगणक अर्हता परीक्षेबाबतः</u>-

शासन निर्णय सा.प्र. विभाग, क्रमांक प्रशिक्षण-2000/प्र.क्र.61/2001/39, दिनांक 19/03/2003 शासननिर्णयान्वये उपरोक्तपदांकरिता अर्ज करणा-या उमेदवारांनी संगणक हाताळणे/वापराबाबतचे खालील नमूद केलेले प्रमाणपत्र त्यांच्या नियुक्तीच्या दिनांका पासून दोन वर्षाच्या आत प्राप्त करणे आवश्यक राहील. अन्यथा त्यांची सेवा समाप्त होईल.

अ) **D.O.E.A.C.C.** सोसायटीच्या अधिकृत '**C.C.C.**' किंवा '**O**' स्तर किंवा '**A**' स्तर '**B**' स्तर किंवा '**C.**' स्तर पैकी कोणतीही एक परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र

किंवा

ब) महाराष्ट्र राज्य उच्च तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांच्याकडील अधिकृत **MS-CIT** परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र.

क) महाराष्ट्र शासन, माहिती तंत्रज्ञान (सा.प्र.वि.) विभागाकडील शासन निर्णय क्र. मातंस 2012/प्र.क्र. 277/39 दिनांक 04 फेब्रुवारी 2013 मध्ये नमुद केलेल्या संगणक/माहिती तंत्रज्ञान विषयक परीक्षा उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना संगणक अर्हता परीक्षा उत्तीर्ण असल्याचे समजण्यात येईल. हा शासन निर्णय शासनाचे अधिकृत www.maharashtra.gov.in संकेतस्थळावर उपलब्ध आहे. वरील प्रमाणपत्रे कागदपत्रे पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील.

2. विभागीय व भाषा परीक्षा :- शासकिय सेवेत रुजु झाल्यानंतर विहित शासकीय नियमांनुसार संबंधित पदास आवश्यक असलेली विभागीय परीक्षा भाषा परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

P|23

3. उमेदवार हा महाराष्ट्रातील रहिवासी असावा. (डोमिसाईल प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक) अर्जदाराने महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असल्याचे शासनाने प्राधिकृत केलेल्या सक्षम अधिकार-यांचे प्रमाणपत्र आवश्यक आहे.
4. सेवाप्रवेश नियमांनुसार उमेदवारास मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे.
5. निवड झालेल्या उमेदवाराने जिल्हा शल्यचिकित्सक यांचेकडून शासकीय सेवा करण्याकरीता शारिरीक क्षमतेचे वैद्यकीय प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.
6. नियुक्तीपूर्वी मूळ शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्रे, शाळा सोडल्याचा दाखला, अनुभवाचा दाखला आवश्यकता असल्यास अद्ययावत नॉनक्रिमीलेअर दाखला तसेच आवश्यक ती मूळ कागदपत्रे इत्यादीची छाननी संबंधीत नियुक्ती प्राधिकारी यांच्या स्तरावर केली जाईल. उमेदवाराने कोणत्याही प्रकारचे प्रमाणपत्र मिळणेकरीता सादर केलेल्या अर्जाच्या पावत्या ग्राह्य धरल्या जाणार नाही. छाननीअंती वरील प्रमाणपत्रामध्ये त्रुटी आढळल्यास/ माहिती खोटी आढळल्यास नियुक्ती दिली जाणार नाही/ नियुक्ती रद्द होईल व खोटी कागदपत्रे सादर केल्याप्रकरणी उमेदवारा विरुध्द कायदेशीर कारवाई प्रस्तावित करण्यात येईल.
7. ज्या उमेदवारांचा समांतर आरक्षणा अंतर्गत गुणवत्ता यादीत समावेश करण्यात आलेला आहे, अशा उमेदवारांनी समांतर आरक्षणासंबंधी सादर केलेल्या कागदपत्रांची पडताळणी संबंधीत विभागाकडून केल्यानंतर व ते त्यामधे पात्र ठरल्यासच त्यांचा अंतिम निवड यादीत समावेश करण्यात येईल.

**ऑनलाईन अर्ज करण्याची पद्धत**

1. प्रस्तुत पदांकरीता फक्त www.wcdexam.in या अधिकृत संकेतस्थळावरुन विहित पध्दतीने भरलेले ऑनलाईन पध्दतीने केलेले अर्ज स्वीकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत. उमेदवारांनी ऑनलाईन अर्जात नोंदविलेला ई-मेल आयडी. व मोबाईल क्रमांक चूकिचा/अपुर्ण तसेच मोबाईल क्रमांक NCPR रजिस्टर्ड (DND) असल्यामुळे संपुर्ण भरती प्रक्रिये दरम्यान त्या द्वारे पाठविल्या जाणा-या सूचना, संदेश व माहीती उमेदवारांना प्राप्त न झाल्यास त्याची संपुर्ण जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील. तसेच ई-मेल आयडी. व मोबाईल संदेश वहनात येणा-या तांत्रिक अडचणींना आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय महाराष्ट्र राज्य, पुणे-1 हे जबाबदार असणार नाहीत. सदर संकेतस्थळाला भरती प्रक्रिये दरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रियेची माहितीबाबत अद्ययावत राहण्याची जबाबदारी उमेदवाराची राहिल.

2. पात्र उमेदवाराला वेब-बेस्ड (Web-based) ऑनलाईन अर्ज www.wcdexam.in या वेबसाईटद्वारे दि. 29/04/2015 दुपारी १२.०० ते दि. 19/05/2015 सायंकाळी ५.३० या कालावधीत सादर करणे आवश्यक राहील.

3. उमेदवारांचे अर्ज ऑनलाईन (online) पध्दतीने स्वीकारण्यात येणार असल्याने अर्ज करतांना, शैक्षणिक कागदपत्रे, अन्य प्रमाणपत्रे जोडणे आवश्यक नाही. तथापि, ऑनलाईन अर्जामध्ये उमेदवाराने त्यांची पात्रतेनुसार काळजीपूर्वक संपुर्ण व खरी माहिती भरणे आवश्यक आहे. ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरतांना काही चुका झाल्यास किंवा त्रुटी राहील्यास व भरतीच्या कोठल्याही टप्प्यावर निदर्शनास आल्या व त्यामुळे अर्ज नाकारला गेल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत उमेदवाराची राहील व याबाबत उमेदवारास तक्रार करता येणार नाही. ऑनलाईन अर्जात भरलेली माहिती भरती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर बदलता येणार नाही. जाहिरातीत नमूद केलेल्या सर्व अटी तसेच शैक्षणिक अर्हता व मागणीनुसार आरक्षण, वयोमर्यादा शिथिलीकरण वगैरेची पात्रता तपासूनच ऑनलाईन अर्ज भरावा.

4. उमेदवाराची लेखीपरीक्षा ही त्यांनी ऑनलाईन अर्जात नमूद केलेल्या पात्रतेनुसार कोणतीही कागदपत्रे पूर्वतपासणी / छाननी न करता घेतली जाणार असल्यामुळे या परीक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारे उमेदवाराला निवडीबाबतचे कोणतेही हक्क राहणार नाहीत. कागदपत्रांच्या पूर्ण छाननीनंतरच उमेदवारांची पात्रता निश्चित करण्यात येईल. लेखीपरिक्षेच्या प्राथमिक चाळणी नुसार गुणवत्तेच्या आधारे, उमेदवारांनी ऑनलाईन अर्जात नमूद केलेल्या गृहित पात्रतेनुसार अंतरिम यादी प्रसिध्द करुन उमेदवारांच्या कागदपत्रांची सखोल छाननी केली जाईल. सदर प्रक्रियेत उमेदवार अपात्र आढळल्यास त्यास निवड प्रक्रियेतून बाद करण्यात येईल. पात्रता धारण न करणा-या उमेदवारांना भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर अपात्र करण्याचे संपूर्ण अधिकार आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे -1 यांनी राखून ठेवले आहेत व याबाबत उमेदवारास कोणतीही तक्रार करता येणार नाही. जाहिराती संबंधी कोणताही आक्षेप असल्यास तो जाहिरातीच्या मुदतीत लेखी स्वरुपात व आवश्यक त्या कागदपत्र/ पुराव्यासह विहित मुदतीत सादर करावा. विहित मुदतीनंतर घेण्यात आलेले आक्षेप विचारात घेतले जाणार नाहीत.

5. ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना www.wcdexam.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. या संकेतस्थळावर, ऑनलाईन अर्ज परिपूर्ण भरल्यानंतर, स्टेट बँक ऑफ इंडिया बँकेत फी भरण्याचे चलन 3 प्रतींमध्ये (उमेदवाराची प्रत, बँकेची प्रत व महिला व बाल विकास आयुक्तालय प्रत) उपलब्ध होईल. सदर चलनाची प्रिंट काढून त्या चलनामार्फतच उमेदवाराने चलनात नमूद असलेली आवश्यक ती फी स्टेट बँक ऑफ इंडियाच्या कोणत्याही शाखेमध्ये पुढच्या कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी भरता येईल. सदरच्या 3 प्रतींपैकी उमेदवारास त्याची स्वतःची प्रत, महिला व बाल विकास आयुक्तालयाची प्रत उमेदवारास स्टेट बँक ऑफ इंडिया, या बँके कडून परत मिळेल. त्यापैकी महिला व बाल विकास आयुक्तालयाची प्रत, उमेदवारांनी कागदपत्र छाननीचे वेळी महिला व बाल विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे -1 यांचे कडे जमा करावी. सदर चलनाची मूळ प्रत असल्याशिवाय उमेदवाराची कागदपत्रे छाननी केली जाणार नाही. बँकेत परीक्षा शुल्क भरण्याचा कालावधी दिनांक 29/04/2015 ते दि. 21/05/2015 असा राहील.

6. उमेदवाराने स्टेट बँक ऑफ इंडियाच्या कोणत्याही शाखेत पैसे भरल्यानंतर उमेदवाराला त्याची स्थिती www.wcdexam.in या संकेतस्थळावरती पुढच्या कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी पाहता येऊ शकेल.

7. ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करताना उमेदवाराने स्वतःचा अद्ययावत (Latest) विहित नमुन्यातील पासपोर्ट साईझ फोटो व सही स्कॅन करुन www.wcdexam.in संकेतस्थळावरील सूचनेनुसार विहित पद्धतीने अपलोड करणे अनिवार्य आहे.

8. ऑनलाईन अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम तारीख व वेळेनंतर संकेतस्थळावरील ऑनलाईन अर्ज भरण्याची लिंक बंद केली जाईल.

9. ऑनलाईन अर्ज प्रक्रियेच्या सर्व टप्प्यातील माहिती परिपूर्ण भरुन विहित परीक्षा शुल्क भरलेल्या उमेदवारांची स्थिती, परिक्षेची रुपरेषा/ वेळापत्रक/ परिक्षाकेंद्र/ बैठक क्रमांक इत्यादी बाबतची माहिती वर दिलेल्या (वेबसाईट) वर वेळोवेळी उपलब्ध करुन देण्यात येईल. या संबंधी स्वतंत्र पत्रव्यवहार केला जाणार नाही. सदर संकेतस्थळाला भरती प्रक्रिये दरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रियेची माहितीबाबत अद्ययावत राहण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील.

10. अपंग संवर्गातील उमेदवाराकडे किमान अपंगत्वाचे प्रमाण 40 टक्के असल्याबाबतचे स्थायी वैद्यकीय मंडळाचे विहीत प्रमाणपत्र असावे. अपंग उमेदवारास लेखी परिक्षेच्यावेळी लेखनिकाची मदत आवश्यक असल्यास ऑनलाईन अर्ज भरताना तसा स्पष्ट उल्लेख करावा. लेखनिकाची परीक्षेची शुल्क रक्कम रु. 100/- ही चलनाद्वारे परिक्षाशुल्का मध्ये वाढ करुन त्या प्रमाणे भरावी लागेल व ती नापरतावा राहील. ज्या उमेदवारांनी लेखनिकाची अर्जात मागणी केलेली नसेल अशा अपंग उमेदवारांना ऐनवेळेस लेखनिक पूरविला

जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी. अपंग प्रवर्गातील पात्र उमेदवारांची अंतिम नियुक्ती ही स्थायी वैद्यकीय मंडळाच्या पात्रता प्रमाणपत्राच्या आधारे करण्यात येईल.

11. ज्या उमेदवारांनी यापूर्वी जरी त्यांचे नाव रोजगार व स्वंयरोजगार मार्गदर्शन केंद्राकडे सेवायोजन कार्यालय/ समाजकल्याण आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी कार्यालयात नांवे नोंदविलेली आहेत अशा उमेदवारांना विहित मुंदतीत स्वतंत्ररित्या ऑनलाईन अर्ज करणे व परीक्षा शुल्क भरणे आवश्यक राहिल. तसेच खेळाडू, प्रकल्पग्रस्त, अंशकालीन इत्यादी समांतर आरक्षणाचा लाभ घेऊ ईच्छिणा-या उमेदवारांनी देखील भरतीच्या अधिकृत वेबसाईटवर स्वतंत्रपणे ऑनलाईन अर्ज सादर करणे व परीक्षा शुल्क भरणे आवश्यक आहे. अशा उमेदवारांनी अन्य कोणत्याही मार्गाने सादर केलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत अशा उमेदवारांना या कार्यालयामार्फत स्वतंत्रपणे कळविले जाणार नाही.

12. शासननिर्णय शालेय व क्रिडाविभाग क्र.राक्रिधो-2002/प्र.क्र.68/क्रियुसे-2, दिनांक 30.4.2005 मधील तरतुदीनुसार अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूंसाठी असलेले आरक्षण त्यांची गुणवत्ता व पात्रता विचारात घेऊन उच्च वयोमर्यादा 5 वर्षापर्यंत शिथिलक्षम राहील. खेळाडू प्रमाणपत्र हे राष्ट्रीय व राज्यस्तरावरील खेळांचे प्राधिकृत केलेल्या सक्षम अधिका-याचे असावे. खेळाडूंच्या आरक्षित पदावर नेमणूकी करिता ज्या उमेदवारांची शिफारस होईल त्यांची प्रमाणपत्रे संचालक, क्रिडा व युवकसेवा महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कडील तपासणी अहवालानंतरच त्यांची नेमणूक देण्यात येईल.

13. अंशकालीन उमेदवारांनी, त्यांनी सुशिक्षीत बेरोजगार अर्थसहाय्य या योजने अंतर्गत तीन वर्षे दरमहा मानधनावर अंशकालीन काम केलेल्या पदवीधर / पदविकाधारक उमेदवारांनी सदरच्या अनुभवाची सेवायोजन कार्यालयाकडे नोंदणी असणे व तशी नोंद ऑनलाईन अर्जात करणे आवश्यक आहे. सदर प्रमाणपत्र व सेवायोजन कार्यालयाकडील प्रमाणपत्र उमेदवारांना कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

14. अनुभवाच्या बाबतीत मासिक, नियतकालीक, अंशकालीक, विदयावेतन, अंशदानात्मक, विनावेतन, तत्वावर केलेला अंशकालीक सेवेचा कालावधी तसेच प्रभारी म्हणून नेमणूकीचा कालावधी, अतिरिक्त कार्याभाराचा कालावधी अनुभवासाठी ग्राहय धरता येणार नाही.

15. माजी सैनिक उमेदवारांनी जिल्हा सैनिक बोर्डात नावनोंदणी केलेली असणे आवश्यक आहे. सदर प्रमाणपत्र, कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करावे लागेल.

16. भूकंपग्रस्त /प्रकल्पग्रस्त उमेदवारांनी शासन नोकरी मिळणेबाबत सक्षम अधिकारी यांचे विहीत प्रमाणपत्र कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

17. महाराष्ट्र राज्य लोकसेवा अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचीत जमाती (विमुक्तजाती), भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग व इतर मागासवर्ग यांच्यासाठी आरक्षण अधिनियम 2001 (सन 2004 चा महाराष्ट्र अधिनियमक्र.8) हा अधिनियम महाराष्ट्र शासनाने दिनांक 29 जानेवारी 2004 पासून अंमलात आणला आहे. त्यानुसार उन्नत व प्रगतगटाचे (क्रिमीलेअर) तत्व वि.जा.(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड), विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागासवर्ग यांना लागू आहे. या प्रवर्गातील उमेदवारांनी जात, उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे वर्ष 2015-16 या कालावधी करिता वैध असलेले (अदययावत अर्थात 31/03/2016 पर्यत वैध असलेले) (नॉनक्रिमीलेयर) प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

18. ज्या महिला उमेदवारांना महिला आरक्षणाचा लाभ हवा असेल त्यांनी तशी मागणी ऑनलाईन अर्जात करणे आवश्यक आहे. शासन निर्णय महिला व बालकल्याण क्र. 82/2001/म.से.आ-2000/प्र.क्र.415/का.2, दि.25/05/2001 मधील तरतूदीनुसार महिलांसाठी आरक्षण राहिल. या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या

आदेशानुसार आरक्षणा अंतर्गत अर्ज करणाऱ्या अविवाहित महिलांनी वडीलांचे (कुटूंबाचे) नावाचा उल्लेख असलेले व विवाहीत महिलांनी पतीच्या (कुटूंबाचे) नावाचा उल्लेख असलेले वर्ष 2015-16 या कालावधी करिता वैध असलेले (अदययावत अर्थात 31/03/2016 पर्यत वैध असलेले) उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे (नॉनक्रिमीलेअर) प्रमाणपत्र कागदपत्र तपासणीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

19. विहित वयोमर्यादेतील शासकीय / निमशासकीय सेवेतील कर्मचा-यांनी त्यांचे अर्ज त्यांचे कार्यालय प्रमुखांच्या परवानगीने विहित मार्गाने विहित मुदतीत अधिकृत संकेतस्थळावरुन ऑनलाईन भरावे व अशा परवानगी घेतल्याची प्रत उमेदवाराकडे असणे आवश्यक आहे व ती कागदपत्रे छाननीवेळी सादर करावी.

20. सामान्य प्रशासन विभाग अधिसुचना क्र.एसआरव्ही-2000/प्र.क्र.17/2000/12, 28 मार्च 2005 व शासन परिपत्रक एसआरव्ही-2000/प्र.क्र.17/2000/12, 01 जुलै 2005 नुसार विहित केलेल्या नुसार व महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कटूंबाचे प्रतिज्ञापन) नियम 2005 अन्वये शासनाने गट अ, ब, क, ड मधील सेवा प्रवेशासाठी प्रतिज्ञापन नमुना(अ) आवश्यक अर्हता म्हणून विहीत नमुन्यातील लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापन बंधनकारक आहे.

21. ऑनलाईन अर्ज केला अथवा विहित अर्हता धारण केली म्हणजे लेखी परिक्षेस/कागदपत्र पडताळणीस बोलाविण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला आहे असे नाही. निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्जदार विहित अर्हता धारण न करणारा आढळल्यास, खोटी माहिती पुरविल्यास, एखादया अर्जदाराने त्याचा निवडीसाठी निवड समितीवर प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष दबाव आणला अथवा गैरप्रकाराचा अवलंब केल्यास त्यास निवड प्रक्रियेतून बाद करण्यात येईल. तसेच, नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता त्यांची नियुक्ती समाप्त करण्यात येईल व त्यांच्या विरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

22. शासन परिपत्रक, आदिवासी विकास विभाग, क्रमांक-14/2000/प्रक्र.43/व-10, दिनांक 28 मे, 2001 नुसार निवड झालेल्या अनुसूचित जमाती उमेदवाराला जातीवैधता पडताळणी प्रमाणपत्र सादर केल्यानंतरच नेमणूकीचे आदेश देण्यात येईल.

23. सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक : बीसीसी-2011/ प्र.क्र.1064/ 2011/16-ब, दिनांक 12 डिसेंबर 2011 मधील तरतूदीनुसार अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग, विशेष मागास प्रवर्ग या प्रवर्गामध्ये निवड झालेल्या उमेदवारांना सहा महिन्याचे आत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील अन्यथा त्यांची नियुक्ती रद्द करण्यात येईल.

24. निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्ती नंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने अर्जात दिलेली माहिती अगर कागदपत्रे खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्या उमेदवारांची उमेदवारी / नियुक्ती रद्द करण्यांत येईल व शासनाची दिशाभूल केल्यामुळे त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात येईल

25. शासन वित्तविभाग निर्णय क्रं.अनियो /10/05/126/सेवा 4/दिनांक 31/10/2005 नुसार दि. 1 नोव्हेंबर 2005 रोजी व त्यानंतर निवड होणा-या उमेदवाराचा नवीन परिभाषीत अंशदान निवृत्ती वेतन योजना लागू राहील, त्यांना सध्या अस्तित्वात असलेली निवृत्तीवेतन योजना (म्हणजे म.ना.सेवा (निवृत्तीवेतन) नियम 1982 व म.ना.से. (निवृत्ती वेतनाचे अंशराशीकरण) नियम 1984) आणि सध्या अस्तित्वात असलेली सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना लागू होणार नाही.

26. अपात्र अर्जदारांस स्वतंत्ररित्या कळविले जाणार नाही.

27. परीक्षेस/कागदपत्र पडताळणीस बोलाविलेल्या अर्जदारांना स्वखर्चाने उपस्थित राहावे लागेल.

P|31

28. वरील अटी, शर्ती, नियमांव्यतिरीक्त शासनाने वेळोवेळी निर्गमीत केलेले आदेश व शासन निर्णय/ परिपत्रक लागू राहतील.

**परीक्षा शुल्क:-**

खालीलप्रमाणे शुल्क भरावे लागेल.

खुला प्रवर्ग - रु. 300 /-     मागास प्रवर्ग - रु. 150/-

माजी सैनिकांना परीक्षा शुल्क माफ आहे.

**(वर दर्शविण्यात आलेले परीक्षाशुल्क बँक प्रोसेसिंग चार्जेस वगळून आहे.)**

उक्त परीक्षा शुल्क स्टेट बँक ऑफ इंडिया बँकेच्या कोणत्याही शाखेत ऑनलाईन अर्जासोबत प्राप्त झालेल्या चलनाद्वारेच रोखीने भरणे आवश्यक आहे.

टिपः - स्टेट बँक ऑफ इंडियाकडून प्रति उमेदवार रु.40/- इतके प्रक्रिया शुल्क आकारले जाईल. सदर शुल्क उमेदवाराने भरावयाचे आहे.

**रिक्त पदे भरतीचा कार्यक्रम खालीलप्रमाणे आहे**

| अ.क्र | भरती प्रकिया कार्यक्रम | दिनांक |
|---|---|---|
| 1 | अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरण्याचा कालावधी | दिनांक 29/04 /2015 ( दुपारी 12.00 पासून) ते दिनांक 19/05 /2015 ( सायंकाळी 05.30 पर्यंत) |
| 2 | बँकेत विहित चलनाद्वारे परीक्षाशुल्क जमा करण्याचा अंतिम दिनांक | दिनांक 21/05 /2015 (बँकेच्या वेळेपर्यत) |

**विशेष सूचना:-**

- या परीक्षेत ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरताना जरी उमेदवारांना कोणतीही कागदपत्रे सादर करावयाची आवश्यकता नाही,तरीही ज्या उमेदवारांकडे पदाकरता आवश्यक शैक्षणिक व इतर पात्रता नसेल अशा उमेदवारांनी अनावश्यक अर्ज करू नयेत.
- अर्जदारांना अर्ज भरण्या संदर्भात काही अडचणी असल्यास त्यासाठी **7776900546/ 47/ 48/ 49** या भ्रमणध्वनीवर संपर्क साधावा.

दिनांक :-     /04 /2015

**आयुक्त**
महिला व बाल विकास
महाराष्ट्र राज्य, पुणे-1

28/8/2017